17 SEP 2026 तरूण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्वच क्षेत्रात महिलांना समान संधीची गरज

- डॉ. प्रतिमा पवार : महावीर महाविद्यालयात महिला विकास कक्षाचे उद्घाटन

त. भा. प्रतिनिधी

कोल्हापूर: शिक्षण रोजगार व आरोग्य यांच्या सुविधाद्वारे राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रात महिलांना समान संधी आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. प्रतिमा पवार यांनी केले.

महावीर महाविद्यालयात महिला विकास कक्षाच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अद्वैत जोशी होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते रोपास पाणी घालून या महिला विकास कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. श्रावणमास ऋतु हिरवा या अनुषंगाने विविध उपक्रम झाले. विविध कला कुसरीच्या वस्तु, पिशव्या, पर्स आर्टिफिशअल ज्वेलरी, इंस्टंट पीठ, सजावटीच्या वस्तु, खाद्यपदार्थांचे प्रदर्शन व विक्रीला प्रतिसाद मिळाला. बारावी वाणिज्य-अ वर्गातील राजनंदीनी पडवळ हिरा श्रावण क्वीनचा पुरस्कार मिळाला. प्रा. डॉ. कल्पना गंगातीरकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संध्या जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. माधुरी रसाळ यांनी सूत्रसंचालन, डॉ. अश्विनी कोटणीस यांनी आभार मानले.



कोल्हापूर : कक्ष उद्घाटनप्रसंगी बोलताना प्रा. डॉ. प्रतिमा पवार. बाजूस डॉ. कल्पना गंगातीरकर, प्रा. माधवी मोरे, डॉ. संध्या जाधव, डॉ. श्रद्धा पाटील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 SEP 2026
सकाळ

# 'टाकाऊ'पासून उपयुक्त वस्तू निर्मिती स्पर्धेला प्रतिसाद

## विद्यापीठात पर्यावरणशास्त्र विभागाचा उपक्रम

कोल्हापूर, ता. १६ : पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्याबरोबरच पर्यावरणविषयक संशोधन, सर्जनशीलता आणि शाश्वत विचारांना चालना देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे विविध उपक्रम घेण्यात आले. पर्यावरणपूरक गणेश मूर्ती निर्मिती कार्यशाळेसह जागतिक ओझोन दिनानिमित्त संशोधन पोस्टर स्पर्धा आणि टाकाऊ वस्तूंपासून उपयुक्त वस्तू निर्मिती स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

भारतीय वातानुकूलन, उष्मा व शीतकरण अभियंता संस्था आणि आरएएसएसएस यांच्या सहकार्याने आणि शाश्वतता मंडळाच्या माध्यमातून शुक्रवारी गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा झाली. कलाकार श्रद्धा पोंबुर्लेकर आणि योगेश साटम यांनी मार्गदर्शन केले.

जागतिक ओझोन दिनानिमित्त 'पर्यावरणीय आव्हाने आणि शाश्वत उपाययोजना' या विषयावर संशोधन पोस्टर स्पर्धा झाली. विद्यार्थ्यांनी पर्यावरणीय आव्हाने, संशोधन व नावीन्यपूर्ण उपाययोजना पोस्टरच्या माध्यमातून मांडल्या. टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करून उपयुक्त, सर्जनशील वस्तू तयार करण्याची स्पर्धा झाली. डॉ. सुषमा पाटील, चैताली बगाडे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

17 SEP 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष

# विद्यापीठात पर्यावरणपूरक गणेश मूर्ती निर्मिती कार्यशाळेला प्रतिसाद

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**
पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्याबरोबरच पर्यावरणविषयक संशोधन, सर्जनशीलता आणि शाश्वत विचारांना चालना देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. पर्यावरणपूरक गणेश मूर्ती निर्मिती कार्यशाळेसह जागतिक ओझोन दिनानिमित्त संशोधन पोस्टर स्पर्धा आणि टाकाऊ वस्तूंपासून उपयुक्त वस्तू निर्मिती स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



पर्यावरणशास्त्र अधिविभागाच्या वतीने भारतीय वातानुकूलन, उष्मा व शीतकरण अभियंता संस्था (ISHRAE) व आरएएसएसएस (RASSS) यांच्या सहकार्याने आणि शाश्वतता मंडळाच्या माध्यमातून शुक्रवारी (दि. ११) आयोजित गणेश मूर्ती निर्मिती कार्यशाळेत कागदाचा लगदा व माती यांचा वापर करून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. कलाकार श्रद्धा शशिकांत पोंबुर्लेकर आणि स्वतंत्र व्यावसायिक कलाकार योगेश अरुण साटम यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेला ५५ पेक्षा अधिक विद्यापीठाबाहेरील सहभागींचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

जागतिक ओझोन दिनानिमित्त 'पर्यावरणीय आव्हाने आणि शाश्वत उपाययोजना' या विषयावर संशोधन पोस्टर स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी पर्यावरणीय आव्हाने, संशोधन व नाविन्यपूर्ण उपाययोजना पोस्टरच्या माध्यमातून मांडल्या. तसेच टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करून उपयुक्त व सर्जनशील वस्तू तयार करण्याची स्पर्धाही घेण्यात आली. संशोधन पोस्टर स्पर्धेसाठी डॉ. सुषमा पाटील व डॉ. चैताली बगाडे, तर टाकाऊ वस्तूंपासून उपयुक्त वस्तू निर्मिती स्पर्धेसाठी डॉ. दीप्ती एन. कुर्‍हे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, कराड येथील सहाय्यक प्राध्यापक डॉ. पुष्पलता घाटगे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी कार्यशाळा व स्पर्धास्थळी भेट देऊन विद्यार्थी व सहभागींचे कौतुक केले. बदलत्या हवामानासह पर्यावरणीय समस्यांचा सामना करण्यासाठी पर्यावरणपूरक व शाश्वत उपाययोजनांचा अवलंब करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमांच्या आयोजनासाठी विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, डॉ. सोनल चोंदे, डॉ. पल्लवी भोसले आणि डॉ. स्मिता पोरे यांनी नियोजन केले. संशोधन विद्यार्थी हसन म्हणा, गौरी पवार, अमृता सूर्यवंशी तसेच पदव्युत्तर भाग-१ व भाग-२च्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 SEP 2026

सिंधुदुर्ग समाचार

# अर्थशास्त्र अधिविभागात पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागातील इकॉनॉमिक्स क्लबतर्फे पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले. या अंतर्गत विद्यार्थ्यांनी विविध आर्थिक विषयांवर नाविन्यपूर्ण मांडणी केली.

विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांच्या हस्ते आणि अधिविभागाचे प्रमुख डॉ. महादेव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. पोस्टर प्रेझेंटेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध आर्थिक, सामाजिक आणि समकालीन विषयांवर प्रभावी सादरीकरण केले. डॉ. कविता वड्राळे यांनी पंच म्हणून काम पाहिले. क्लबचे समन्वयक डॉ. डी. आर. ननवरे व डॉ. दिग्विजय पाटील यांनी संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 SEP 2026
लोकमत

# अर्थशास्त्र विभागात पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागातील इकॉनॉमिक्स क्लबतर्फे आयोजित पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध आर्थिक विषयांवर नावीन्यपूर्ण मांडणी केली. व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांच्या हस्ते आणि विभाग प्रमुख डॉ. महादेव देशमुख यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. पोस्टर प्रेझेंटेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध आर्थिक, सामाजिक आणि समकालीन विषयांवर प्रभावी सादरीकरण केले. डॉ. कविता वड्राळे यांनी पंच म्हणून काम पाहिले. समन्वयक डॉ. डी. आर. ननवरे आणि डॉ. दिग्विजय पाटील यांनी संयोजन केले.

17 SEP 2026 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021) With CGPA 3.52

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## Tender ID - 2026_SUK_1338225_1

Sealed percentage rate e-tenders are invited from experienced P.W.D. registered contractors for **civil works** by the Registrar, Shivaji University, Kolhapur. The detailed tender notice and relevant tender documents are available on **web-site of Government of Maharashtra "https://mahatenders.gov.in"**. Interested parties should submit online tender accordingly by getting their firm's name registered with above said URL. Right to accept or reject any or all the tenders is reserved by the University without assigning any reason.

**Su/Engg/Civil/**

Date : 17/09/2026

**Dr. V. N. Shinde**

Registrar

जनसंपर्क कक्ष
ावाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 SEP 2026
पुढारी

Estd : 1962
"A++" Accredited
by NAAC (2021)
with CGPA 3.52

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## Tender ID - 2026_SUK_1338226_1

Shivaji University invites online tender for Sweeping and maintenance of Cleanliness (House Keeping) Services for a period of one year at various locations on Shivaji University campus. Relevant Tender documents are available on web-site **"http://unishivaji.sets.co.in"** Interested eligible bidders shall submit online their bids accordingly by getting their firm's name registered with above said URL.

**Right to accept or reject any or all tenders is reserved by the University without assigning any reason.**

**Last date of Tender submission :- 30/09/2026 up to 03.00 pm.**

SU/Engg/
Date:-17/09/2026

**Dr. Vilas N. Shinde**
Registrar

17 SEP 2026 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd : 1962
"A++" Accredited by
NAAC (2021)
with CGPA 3.52

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## Tender ID - 2026_SUK_1338225_1

Sealed percentage rate e-tenders are invited from experienced P.W.D. registered contractors for **civil works** by the Registrar, Shivaji University, Kolhapur. The detailed tender notice and relevant tender documents are available on **web-site of Government of Maharashtra "https://mahatenders.gov.in".** Interested parties should submit online tender accordingly by getting their firm's name registered with above said URL. Right to accept or reject any or all the tenders is reserved by the University without assigning any reason.

**Su/Engg/Civil/**
Date:-17/09/2026

**Dr. V. N. Shinde**
Registrar